सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १९१३ चा २)

# पदस्थ विश्वस्त अधिनियम, १९१३

(महाराष्ट्र राज्यास लागू असल्याप्रमाणे)

(३० जून २००८ पर्यंत सुधारित)

**(ACT II OF 1913)**

# THE OFFICIAL TRUSTEES ACT, 1913

**(In it's application to the State of Maharashtra)**

**(as modified up to the 30th June, 2008)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१२

[ किंमत : ०.०० रुपये ]

## सुधारणा अधिनियम आणि अनुकूलन आदेश यांची यादी

१. निरसन आणि सुधारणा अधिनियम, १९१४ (१९१४ चा १०).

२. अभिलेख नष्ट करणे अधिनियम, १९१७ (१९१७ चा ५).

३. निरसन आणि सुधारणा अधिनियम, १९१९ (१९१९ चा १८).

४. पदस्थ विश्वस्त आणि महाप्रशासक (सुधारणा) अधिनियम, १९२२ (१९२२ चा २१).

५. निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १२).

६. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७.

७. भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय अधिनियम आणि अध्यादेश अनुकूलन) आदेश, १९४८.

८. विधि अनुकूलन आदेश, १९५०.

९. भाग ' ब ' राज्ये (विधि) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३).

१०. म्हैसूर उच्च न्यायालय (कुर्गपर्यंत अधिकारितेत वाढ करणे) अधिनियम, १९५२ (१९५२ चा ७२).

११. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६.

१२. पदस्थ विश्वस्त (सुधारणा) अधिनियम, १९६४ (१९६४ चा ४८).

१३. केंद्रीय कायदे (जम्मू आणि काश्मिर यांस लागू) अधिनियम, १९६८ (१९६८ चा २५).



वि (एच) ४३४

# पदस्थ विश्वस्त अधिनियम, १९१३

कलमांचा क्रम

**अनुक्रमणिका**


| उद्देशिका कलमे | | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | **भाग एक** | | |
| | प्रारंभिक | | |
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | ... | १ |
| २ | निर्वचन खंड | ... | २ |
| ३ | उच्च न्यायालयाच्या अधिकारितेत वाढ | ... | २ |
| | **भाग दोन** | | |
| | पदस्थ विश्वस्ताचे पद | | |
| ४ | पदस्थ विश्वस्त | ... | २ |
| ५ | उपपदस्थ विश्वस्ताची नियुक्ती आणि त्याचे अधिकार | ... | ३ |
| ६ | पदस्थ विश्वस्त एकमेव निगम निकाय असणे आणि त्याची अखंड परंपरा आणि अधिकृत मोहोर असेल आणि त्या नावाने त्याला किंवा त्याच्यावर दाखल करता येईल. | | ४ |
| | **भाग तीन** | | |
| | पदस्थ विश्वस्ताचे हक्क, अधिकार, कर्तव्ये आणि दायित्वे | | |
| ७ | पदस्थ विश्वस्ताचे सर्वसाधारण अधिकार व कर्तव्ये | ... | ४ |
| ८ | पदस्थ विश्वस्ताची त्याच्या संमतीने प्रदात्याकडून व्यवस्था विश्वस्त म्हणून नियुक्ती करता येईल. | | ५ |
| ९ | इच्छापत्राद्वारे विश्वस्त म्हणून पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती | ... | ६ |
| १० | मालमत्तेचा विश्वस्त राहावयासाठी पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार. | | ६ |

## अनुक्रमणिका--चालू


| उद्देशिका कलमे | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ११ | मालमत्तेचा विश्वस्त राहावयासाठी पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करण्याचा खाजगी विश्वस्तांचा अधिकार. | ७ |
| १२ | निष्पादकास किंवा प्रशासकास अज्ञान किंवा वेड्या व्यक्तीचे उत्तर-दान, हिस्सा, इत्यादी पदस्थ विश्वस्ताकडे प्रदेय करता येईल. | ७ |
| १३ | पदस्थ विश्वस्ताने बंधपत्र किंवा प्रतिभूती देणे आवश्यक नसणे .. | ८ |
| १४ | पदस्थ विश्वस्ताची नोंद एखाद्या न्यासाची नोटीस असल्याचे प्रस्थापित न करणे. | ८ |
| १५ | शासनाचे दायित्व. ... | ८ |
| १६ | विवक्षित प्रकरणांमध्ये दाव्याची नोटीस आवश्यक नसणे. ... | ९ |
| | **भाग चार** | |
| | फी | |
| १७ | फी. ... | ९ |
| १८ | फीचा विनियोग. ... | ९ |
| | **भाग पाच** | |
| | **लेखापरीक्षा** | |
| १९ | पदस्थ विश्वस्तांचे लेखे, इत्यादी तपासण्यासाठी आणि शासनास अहवाल देण्यासाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे. | १० |
| २० | साक्षीदारांना समन्स बजावण्याचे आणि दस्तऐवज मागवण्याचे लेखापरीक्षकांचे अधिकार. | १० |
| २१ | लेखापरीक्षेचा खर्च, वगैरे कसा द्यावयाचा. ... | ११ |
| २२ | लेख्यांच्या प्रती तपासणीचा लाभार्थीचा हक्क. ... | ११ |

| उद्देशिका कलमे | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **भाग सहा** | |
| | **संकीर्ण** | |
| २३ | शासकीय विश्वस्ताच्या अखत्यारीत असणारे संचय शासनाकडे हस्तांतरित करणे | ११<br>१२ |
| २४ | अशा प्रकारे हस्तांतरित केलेला पैसा वसूल करण्यासाठी मागणीदाराकडून कार्यवाहीची पद्धत. | १२ |
| २५ | पदस्थ विश्वस्ताकडे निहित असलेल्या मालमत्तेच्या संबंधात आदेश काढण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार. | १२ |
| २६ | अधिनियमान्वये आदेशाकरिता कोणास अर्ज करता येईल. | १२ |
| २७ | हुकूमनामा लागू करण्याचा न्यायालयाचा आदेश. | १३ |
| २८ | प्रशासनाचे सर्वसाधारण अधिकार. | १३ |
| २९ | पदस्थ विश्वस्ताकडून मूळ विश्वस्ताकडे किंवा अन्य कोणत्याही विश्वस्ताकडे न्यास मालमत्तेचे हस्तांतरण. | १३ |
| ३० | नियम .. | १३ |
| ३१ | [निरसित] .. | १५ |
| ३२ | भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या तरतुदींची व्यावृत्ती .. | १५ |
| ३२ अ | व्यावृत्ती .. | १५ |
| ३२ ब | राज्य पुनर्रचनेद्वारे बाधा पोचलेल्या विवक्षित पदस्थ विश्वस्तांच्या संबंधात विशेष तरतूद. | १६ |
| ३३ | [निरसित] .. | १६ |

## सन १९१३ चा अधिनियम क्रमांक २

## शासकीय विश्वस्त अधिनियम, १९१३[1]

**(२७ फेब्रुवारी १९१३)**

पदस्थ विश्वस्ताचे पद घटित करण्यासाठी कायदा एकत्रित करण्याकरिता आणि त्यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

[2] * * * याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे.

### भाग एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.** १. (१) या अधिनियमास, पदस्थ विश्वस्त अधिनियम, १९१३ असे म्हणावे.

[3][(२) तो संपूर्ण भारतभर लागू होईल [4]* * *.]

या अधिनियमातील कोणतीही गोष्ट न्यास मालमत्तांचे व्यवस्थापन आणि वितरण किंवा मुंबई बॅरोनेटसी अधिनियम, १९५९ (१९६० चा ९) अन्वये पदस्थ विश्वस्ताची कामगिरी किंवा कोणतीही कार्ये यांना लागू होणार नाही.

हा अधिनियम, पदस्थ विश्वस्त (बंगाल सुधारणा) अधिनियम, १९४० (१९४० चा बंगाल १२) याच्या पूर्वीच्या बंगालच्या प्रांतास आणि पदस्थ विश्वस्त (बंगाल सुधारणा) अधिनियम, १९४१ (१९४१ चा बंगाल १) आणि १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ९ द्वारे बेअररमध्ये लागू करताना सुधारित करण्यात आला आहे.

बेअरर विधि अधिनियम, १९४१ (१९४१ चा ४) द्वारे बेअररसाठी आणि सन १९६३ चा विनियमन अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम २ आणि अनुसूची एकद्वारे दादरा व नगर हवेलीसाठी (दिनांक १ जुलै १९६५ रोजी व तेव्हापासून) लागू करण्यात आला आहे.

---

[1] उद्देश व कारणे यांचे निवेदन याकरिता भारतीय राजपत्र, १९१२, भाग पाच. इं. पृ. २०२ पहा; निवड समितीच्या अहवालाकरिता वरील राजपत्र, १९९३, भाग पाच, इं. पृ. १९ पहा; आणि परिषदेतील कार्यवाहीकरिता, वरील राजपत्र, १९१२, भाग सहा, इं. पृ. ६९९ आणि वरील राजपत्र, १९१३, भाग सहा, पृष्ठ १५ आणि २८ पहा.

[2] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ द्वारे उद्देशिका वगळण्यात आली.

[3] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६८ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २ आणि अनुसूचीद्वारे "जम्मू आणि काश्मिर राज्य खेरीज करून" हा मजकूर वगळण्यात आला.

(३) तो [१](केंद्र सरकार) [२][राजपत्रातील] अधिसूचनेद्वारे निदेश देईल अशा दिनांकास [३]अंमलात येईल.

**निर्वचन खंड** [४][२. या अधिनियमात, विषयात किंवा संदर्भात कोणतीही गोष्ट प्रतिकूल नसेल तर,--

(१) "शासन" किंवा "सरकार" याचा अर्थ, राज्याच्या संबंधात राज्य शासन आणि संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात केंद्र सरकार, असा आहे.

[५][ * * * ]

(३) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.]

**उच्च न्यायालयाच्या अधिकारितेत वाढ** [६][३. उच्च न्यायालय, या अधिनियमान्वये किंवा भारतीय न्यास अधिनियम, १८८२ अन्वये, पदस्थ विश्वस्ताद्वारे किंवा त्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या कार्यवाहींच्या संबंधात, ज्या राज्यक्षेत्रात दिवाणी अपिलीय अधिकारितेचा वापर करण्यात येत असेल त्या संपूर्ण राज्यक्षेत्रांच्या संबंधात, एक सक्षम न्यायालय असेल ; **१८८२ चा २.**

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीचा अन्वयार्थ कोणत्याही जिल्हा न्यायालयाच्या अधिकारितेला बाधा पोचविणारा आहे असा लावला जाणार नाही.]

## भाग दोन

## पदस्थ विश्वस्ताचे पद

**पदस्थ विश्वस्त.** ४. [७][(१) [८][सरकार प्रत्येक राज्याकरिता पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करील];

परंतु, यात काहीही अंतर्भूत असले तरीही, दोन किंवा अधिक [९][राज्ये] यांकरिता पदस्थ विश्वस्त म्हणून त्याच व्यक्तीची नियुक्ती करण्यास रोध केला असल्याचे मानण्यात येईल.]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे ' गव्हर्नर इन कौन्सिल ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील आदेशाद्वारे "भारताचे राजपत्र" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] दिनांक १ एप्रिल १९१४, अधिसूचना क्रमांक १८०१-सी, दिनांक १३ मार्च १९१४, भारताचे राजपत्र, १९१४ भाग एक इं. पृ. ३६५ पहा.

[४] विधि अनुकूलन आदेश (क्रमांक २) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ३ खंड (२) द्वारे, वगळण्यात आला.

[६] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ४ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला, अनुकूलन आदेश (क्रमांक २) १९५६ द्वारे पूर्वीचे कलम ३ निरसित करण्यात आले.

[७] विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] विधि अनुकूलन आदेश (क्रमांक २), १९५६ द्वारे पहिल्या परिच्छेदाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "विभाग" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(२) ज्या व्यक्तीने किमान--

(अ) अधिवक्ता म्हणून सात वर्षे, किंवा

(ब) उच्च न्यायालयाचा मुखत्यार म्हणून सात वर्षे; किंवा

(क) राज्याच्या न्यायिक सेवेचा एखादा सदस्य म्हणून दहा वर्षे ; किंवा

(ड) एखादा उपपदस्थ विश्वस्त म्हणून पाच वर्षे]

[२]* * * *

काम केलेले नसेल तर त्या व्यक्तीची पदस्थ विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात येणार नाही.

**उपपदस्थ विश्वस्ताची नियुक्ती आणि त्याचे अधिकार.**

५. [३][(१)] सरकार पदस्थ विश्वस्ताला सहाय्य करण्यासाठी, उपविश्वस्ताची किंवा विश्वस्तांची नियुक्ती करील; आणि अशाप्रकारे नियुक्त केलेला कोणताही उपविश्वस्त, हा, सरकारच्या नियंत्रणाच्या व पदस्थ विश्वस्ताच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीन, पदस्थ विश्वस्तांच्या कर्तव्यापैकी कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी आणि त्याच्या अधिकारापैकी कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी सक्षम असेल आणि अशी कर्तव्ये पार पाडताना किंवा असे अधिकार वापरताना, पदस्थ विश्वस्तांना जे विशेषाधिकार असतील तेच विशेषाधिकार त्याला असतील आणि पदस्थ विश्वस्ताप्रमाणे त्याच दायित्वांना अधीन असतील.

[४][(२) ज्या व्यक्तीने किमान तीन वर्षे--

(अ) अधिवक्ता; किंवा

(ब) उच्च न्यायालयाचा मुखत्यार; किंवा

(क) राज्याच्या न्यायिक सेवेचा एखादा सदस्य,

म्हणून काम केलेले नसेल तर त्या व्यक्तीची उपविश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात येणार नाही.]

---

[१] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ५ द्वारे, पोट-कलम (२) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे, पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[३] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ६ द्वारे त्या कलमाच्या कलम ५ ला पोट-कलम (१) असा पुन्हा क्रमांक देण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

पदस्थ विश्वस्त एकमेव निगम निकाय असणे आणि त्याची अखंड परंपरा आणि अधिकृत मोहोर असेल आणि त्या नावाने त्याला किंवा त्याच्यावर दावा करता येईल.

६. पदस्थ विश्वस्त हा, त्याची ज्या राज्यासाठी नियुक्ती करण्यात आली असेल त्या [१][राज्याचा] पदस्थ विश्वस्त या नावाचा एकमेव निगम निकाय असेल आणि असा विश्वस्त म्हणून त्याची अखंड परंपरा आणि अधिकृत मोहोर असेल आणि त्या नावाने त्याला किंवा त्याच्यावर दावा करता येईल.

## भाग तीन

## पदस्थ विश्वस्ताचे हक्क, अधिकार, कर्तव्ये आणि दायित्वे

पदस्थ विश्वस्ताचे सर्वसाधारण अधिकार व कर्तव्ये

७. (१) या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून आणि त्यांस अनुसरून, पदस्थ विश्वस्तास, त्यास योग्य वाटले तर--

(अ) सर्वसाधारण विश्वस्त म्हणून काम करता येईल;

(ब) सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाकडून विश्वस्ताची नियुक्ती करता येईल.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "विभाग" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) यात यापुढे स्पष्टपणे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, पदस्थ विश्वस्ताला, त्याच नात्याने काम करणाऱ्या अन्य कोणत्याही विश्वस्ताप्रमाणे तेच अधिकार, तिच कर्तव्ये व तिच दायित्वे असतील आणि तो त्याच हक्कांसाठी आणि विशेषाधिकारांसाठी हक्कदार असेल आणि तो न्यायालयाच्या त्याच नियंत्रणाअधीन आणि आदेशांच्या अधीन असेल.

(३) पदस्थ विश्वस्तास, एकतर संपूर्णपणे किंवा त्याच्यावर लादता येतील अशा शर्ती खेरीज करून, कोणत्याही न्यासाची स्वीकृती नाकारता येईल.

(४) पदस्थ विश्वस्त धनकोंच्या लाभाकरिता कोणत्याही रचनेखालील किंवा क्रमवार योजनेखालील कोणताही न्यास किंवा नादार असल्याची त्याला माहीत असलेली किंवा त्याचा तसा विश्वास असलेली अशी कोणतीही संपदा स्वीकारणार नाही.

(५) पदस्थ विश्वस्त, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांद्वारे तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, धार्मिक प्रयोजनासाठी असलेल्या कोणत्याही न्यासाचा किंवा ज्यामध्ये व्यवस्थापनाचा अंतर्भाव आहे किंवा कोणतेही कामकाज चालविले जाते अशा कोणत्याही न्यासाचा स्वीकार करणार नाही.

(६) पदस्थ विश्वस्त, त्याची मृत व्यक्तीच्या इच्छापत्रानुसार एकमेव निष्पादक म्हणून स्पष्टपणे नियुक्ती केली नसेल व त्या अधीन एकमेव विश्वस्त नसेल तर, त्या मृत व्यक्तीच्या संपदेचे प्रशासन करणार नाही.

(७) पदस्थ विश्वस्त, हा नेहमीच एकमेव विश्वस्त असेल आणि अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर विश्वस्त व्हावयासाठी पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करणे हे विधिसंमत नसेल.

**पदस्थ विश्वस्ताची त्याच्या संमतीने प्रदात्याकडून व्यवस्था विश्वस्त म्हणून नियुक्ती करता येईल.**

८. (१) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये पदस्थ विश्वस्ताने स्वीकारण्यास प्रतिबंध केलेल्या न्यासाव्यतिरिक्त एखाद्या न्यासाची निर्मिती करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, न्यासाची निर्मिती करणारा संलेख करून आणि पदस्थ विश्वस्तांच्या संमतीने, अशा न्यासाच्या अधीन राहून, मालमत्तेचा विश्वस्त म्हणून, त्यास त्या नावाने किंवा अन्य कोणत्याही पुरेशा वर्णनाने त्याची नियुक्ती करता येईल :

परंतु, पदस्थ विश्वस्ताची संमती उक्त संलेखामध्ये दाखविण्यात येईल आणि असा संलेख पदस्थ विश्वस्ताकडून रीतसर निष्पादित करण्यात येईल.

(२) अशा नियुक्तीवरून, न्यासाकडे अधीन असलेली मालमत्ता, ही, अशा पदस्थ विश्वस्ताकडे निहित असेल आणि ती त्यांच्याकडून अशा संलेखामध्ये जाहीर करण्यात आलेल्या न्यासानुसार धारण करण्यात येईल.

**इच्छापत्राद्वारे विश्वस्त म्हणून पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती.** ९. जेव्हा कोणत्याही इच्छापत्रान्वये त्या नावाने किंवा अन्य कोणत्याही पुरेशा वर्णनाने पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करण्यात आली असेल तेव्हा, [1][इच्छापत्रकर्त्याच्या] इच्छापत्राचा निष्पादक किंवा त्याच्या संपदेचा प्रशासक, इच्छापत्र प्रमाणपत्र किंवा व्यवस्थापनपत्र मिळविल्यानंतर, अशा पदस्थ विश्वस्ताला अशा इच्छापत्राचा आशय विहित रीतीने अधिसूचित करील आणि न्यासाची स्वीकृती करण्याच्या अशा पदस्थ विश्वस्ताच्या संमतीनंतर, अशा निष्पादकाने किंवा प्रशासकाने पदस्थ विश्वस्ताच्या विश्वासाच्या अधीन राहून, मालमत्ता हस्तांतरित करणारे लेखी संलेख निष्पादन केल्यावर अशी मालमत्ता अशा पदस्थ विश्वस्ताकडे निहित होईल आणि उक्त इच्छापत्रामध्ये स्पष्ट केलेल्या न्यासावर त्याच्याकडून निर्णय घेण्यात येईल :

परंतु, पदस्थ विश्वस्ताची संमती उक्त संलेखामध्ये दाखविण्यात येईल आणि असा संलेख पदस्थ विश्वस्ताकडून रीतसर निष्पादित करण्यात येईल.

**मालमत्तेचा विश्वस्त राहावयासाठी पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार.** १०. (१) जर कोणतीही मालमत्ता ही या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये, पदस्थ विश्वस्ताने स्वीकारण्यास प्रतिबंध केलेल्या न्यासाव्यतिरिक्त अन्य न्यासाच्या अधीन असेल, तर, आणि न्यासामध्ये काम करण्यास इच्छुक असणारा किंवा समर्थ असणारा उच्च न्यायालयाच्या साधारण किंवा असाधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक हद्दींमध्ये कोणताही विश्वस्त नसेल तर, उच्च न्यायालयास, अर्ज केल्यावर अशा मालमत्तेचा विश्वस्त राहावयासाठी त्या विश्वस्ताच्या संमतीने त्याच्या नावाने आदेश काढून, पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करता येईल.

(२) अशा आदेशावरून, अशी मालमत्ता पदस्थ विश्वस्ताकडे निहित होईल आणि पूर्वीच्या अशा आदेशाद्वारे जो निर्णय देण्यात आला होता त्याचप्रमाणे त्याच न्यासावर त्याच्याकडून निर्णय देण्यात येईल आणि पूर्वीचा किंवा पूर्वीचे विश्वस्त (कोणतेही असल्यास), त्यांना अशा आदेशाच्या दिनांकापूर्वी करण्यात आलेल्या कार्यवाहींच्या संबंधात असेल ते खेरीज करून, अशा मालमत्तेचे विश्वस्त म्हणून दायित्वांपासून सूट देण्यात येईल.

(३) या कलमातील कोणतीही गोष्ट, भारतीय न्यास अधिनियम १८८२ याच्या [2][* * *] तरतुदींनी बाधा आणत असल्याचे मानण्यात येणार नाही. **१८८२ चा २.**

---

[1] सन १९१९ च्या अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २, अनुसूची एकद्वारे "असा मृत्युपत्रकर्ता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ७ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

**मालमत्तेचा विश्वस्त राहावयासाठी पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करण्याचा खाजगी विश्वस्तांचा अधिकार.**

११. (१) कोणतीही मालमत्ता ही, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये पदस्थ विश्वस्ताने स्वीकारण्यास प्रतिबंध केलेल्या न्यासाव्यतिरिक्त अन्य एखाद्या न्यासाच्या अधीन असेल तर, आणि सर्व विश्वस्त किंवा उत्तरजीवी अथवा विद्यमान एक किंवा अनेक विश्वस्त आणि न्यासामध्ये लाभार्थ हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्ती, अशा विश्वस्ताच्या किंवा विश्वस्तांच्या ऐवजी पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करण्यात येईल यासाठी इच्छुक असतील तर, अशा मालमत्तेचा विश्वस्त राहावयासाठी त्याच्या संमतीने, त्याच्या नावाने किंवा त्याच्या अन्य कोणत्याही पुरेशा वर्णनाने, लेखी संलेखाद्वारे, पदस्थ विश्वस्ताची नियुक्ती करणे हे अशा विश्वस्ताकरिता किंवा विश्वस्तांकरिता विधिसंमत असेल ;

परंतु, पदस्थ विश्वस्ताची संमती उक्त विलेखामध्ये कथन करण्यात येईल आणि असा संलेख त्याच्याकडून रीतसर निष्पादित करण्यात येईल.

(२) अशा नियुक्तीवरून अशी मालमत्ता पदस्थ विश्वस्ताकडे निहित होईल आणि अशी नियुक्ती केल्यावर पूर्वोक्तप्रमाणे जसा धारण करण्यात आला होता त्याचप्रमाणे तोच न्यास त्याच्याकडून धारण करण्यात येईल, आणि अशा नियुक्तीच्या दिनांकापूर्वी केलेल्या कार्यवाहींच्या संबंधात असेल ते खेरीज करून, अशा मालमत्तेचे विश्वस्त म्हणून सर्व दायित्वांपासून पूर्वोक्त विश्वस्ताला किंवा विश्वस्तांना सूट देण्यात येईल.

**निष्पादकास किंवा प्रशासकास अज्ञान किंवा वेड्या व्यक्तीचे उत्तरदान, हिस्सा, इत्यादी पदस्थ विश्वस्ताकडे प्रदेय करता येईल.**

१२. (१) जर कोणतीही [अज्ञान] किंवा वेड लागलेली व्यक्ती, मृत व्यक्तीच्या मालमत्तेमधून कोणतीही भेटवस्तू उत्तरदान किंवा हिस्सा मिळण्यास हक्कदार असेल तर, ज्या व्यक्तीद्वारे अशी भेटवस्तू देण्यात आली आहे, अशी व्यक्ती किंवा ज्यांच्याद्वारे असे उत्तरदान किंवा हिस्सा प्रदेय असेल किंवा हस्तांतरणीय असेल असा निष्पादक किंवा प्रशासन किंवा अशी भेटवस्तू, उत्तरदान किंवा हिस्सा यांचा कोणताही विश्वस्त यांच्याकरिता पदस्थ विश्वस्ताकडे त्याच्या नावाने किंवा त्याच्या संमतीने कोणत्याही अन्य पुरेशा वर्णनाने लेखी संलेख करून ती भेटवस्तू, उत्तरदान किंवा हिस्सा हस्तांतरित करणे हे विधिसंमत असेल :

परंतु, पदस्थ विश्वस्ताची संमती उक्त संलेख्यामध्ये कथन करण्यात येईल आणि असा संलेख पदस्थ विश्वस्ताकडून रीतसर निष्पादित करण्यात येईल ;

(२) या कलमान्वये पदस्थ विश्वस्ताकडे हस्तांतरित केलेला कोणताही पैसा किंवा कोणतीही मालमत्ता त्याच्याकडे निहित असेल आणि अशा पदस्थ विश्वस्ताकडे निहित असलेल्या इतर मालमत्तेप्रमाणे या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या त्याच तरतुदींच्या अधीन असेल.

**पदस्थ विश्वस्ताने बंधपत्र किंवा प्रतिभूती देणे आवश्यक नसणे.**

१३. (१) कोणत्याही पदस्थ विश्वस्ताला, या अधिनियमाखालील कोणत्याही कक्षेत त्याच्या नियुक्तीसाठी कोणतेही बंधपत्र किंवा प्रतिभूती करणे कोणत्याही न्यायालयाकडून आवश्यक असणार नाही.

(२) कोणत्याही पदस्थ विश्वस्ताला, [1][* * *] या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये त्याने दाखल केलेल्या त्याच्या स्वाक्षरीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही विनंती अर्जाची पडताळणी करणे आवश्यक असणार नाही, आणि अशा कोणत्याही विनंती अर्जामध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती, [2][त्याच्या वैयक्तिक माहितीच्या] कक्षेत येत नसेल तर, विनंती अर्जाची पडताळणी करण्यास सक्षम असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून पडताळणी करण्यात येईल आणि त्यावर तो स्वाक्षरी करील.

**पदस्थ विश्वस्ताची नोंद एखाद्या न्यासाची नोटीस असल्याचे प्रस्थापित न करणे.**

१४. पदस्थ विश्वस्ताची एखाद्या कंपनीच्या पुस्तकांमध्ये त्या नावाने केलेली नोंद न्यासाची नोटीस असल्याचे प्रस्थापित करण्यात येणार नाही; आणि ती कंपनी, पदस्थ विश्वस्त हे एक महामंडळ आहे केवळ या कारणास्तव त्याच्या नोंदवहीवर पदस्थ विश्वस्ताच्या नावाची नोंद करण्याबाबत आक्षेप घेण्यास हक्कदार असणार नाही; आणि वस्तुतः मालमत्तेचा व्यवहार करताना त्याच्याशी संबंधित व्यक्ती ही पदस्थ विश्वस्त असेल तर तो स्वतः एखाद्या न्यासाची नोटीस प्रस्थापित करणार नाही.

**शासनाचे दायित्व.**

१५. (१) पदस्थ विश्वस्त हा खाजगी विश्वस्त असता तर तो दायित्व फेडण्यासाठी व्यक्तिशः दायी असेल ते कोणीही दायित्व फेडण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व रकमा [3][ * * * ] सरकारच्या [4][ * * * ] भरून काढण्याकरिता दायी असेल. त्यातून एकतर पदस्थ विश्वस्ताला किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारे अंशदानित करून किंवा एकतर त्याला किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यांना वाजवी कार्यतत्परता दाखवून टाळता येऊ शकले असते असे दायित्व अपवाद असेल, आणि एकतर या दोन्ही प्रकरणांमध्ये पदस्थ विश्वस्तच नाही तर [5][सरकार] देखील कोणत्याही दायित्वाच्या अधीन राहणार नाही.

---

[1] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ९ द्वारे "किंवा उपशासकीय विश्वस्त" हा मजकूर वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे "शासकीय विश्वस्त, वैयक्तिक माहिती" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९२२ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ द्वारे "भारत" हा मजकूर वगळण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे "महसूल" हा मजकूर वगळण्यात आला.

[5] सन १९२२ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३, विधि अनुकूलन आदेश, १९३७ आणि सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याचे कलम १० याद्वारे 'भारत सरकारचा महसूल' या मजकुरात क्रमशः सुधारणा करण्यात आली असून तो उपरोक्तप्रमाणे वाचण्यात यावा.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही पदस्थ विश्वस्ताच्या प्राधिकाराद्वारे किंवा तदन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीकरिता [१][सरकार] किंवा या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेल्या पदस्थ विश्वस्त यांस दायी ठरविण्यात आल्याचे मानण्यात येणार नाही.

**विवक्षित प्रकरणांमध्ये दाव्याची नोटीस आवश्यक नसणे.** १६. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या कलम ८० मधील कोणतीही गोष्ट, पदस्थ विश्वस्ताविरुद्धच्या ज्या दाव्यांमध्ये त्याच्याकडून व्यक्तिशः कोणतीही अनुतोषाची मागणी केलेली नाही त्या कोणत्याही दाव्याला लागू होणार नाही. **१९०९ चा ५.**

## भाग चार

## फी

**फी** १७. (१) पदस्थ विश्वस्तांच्या कर्तव्यांच्या संबंधात शासन विहित करील त्याप्रमाणे टक्केवारीच्या स्वरूपात किंवा अन्य स्वरूपात असेल अशी फी आकारण्यात येईल.

[२][ * * * * ]

(२) या कलमाखालील फीचे, निरनिराळ्या मालमत्तांकरिता किंवा मालमत्तांच्या वर्गाकरिता किंवा निरनिराळ्या कर्तव्यांकरिता वेगवेगळे दर असतील आणि शक्य असेल तेथवर वेतन आणि हा अधिनियम कार्यरत करण्याच्या संबंधात आनुषंगिक सर्व इतर खर्च (या अधिनियमाअन्वये हानीनुसार [३][ * * * ] सरकाराचा [४][ * * * ] सुनिश्चित करणे आवश्यक असलेल्या, सरकारला निर्धारित करील अशा रकमेसह) फेडण्यासाठी पुरेशी रक्कम देता येईल अशा रीतीने व्यवस्था लावण्यात येईल.

**फीचा विनियोग.** १८. (१) न्यास निधीमधून धारण करता आला असता किंवा त्यामधून चुकता करता आला असता असा सर्व खर्च हा, पदस्थ विश्वस्त हा खाजगी विश्वस्त असेल तर, त्याचप्रकारे धारण करण्यात येईल किंवा चुकता करण्यात येईल, आणि या अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेली कोणतीही फी, अशा खर्चाप्रमाणे व अशा खर्चाव्यतिरिक्त तशाच रीतीने धारण करण्यात येईल व चुकती करण्यात येईल.

---

[१] सन १९२२ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३, विधि अनुकूलन आदेश, १९३७ आणि सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याचे कलम १० याद्वारे 'भारत सरकारचा महसूल' या मजकुरात क्रमशः सुधारणा करण्यात आली असून तो उपरोक्तप्रमाणे वाचण्यात यावा.

[२] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ११ द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

[३] सन १९२२ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ४ द्वारे, "भारत" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ११ द्वारे 'महसूल' हा मजकूर वगळण्यात आला.

(२) पदस्थ विश्वस्त, या अधिनियमान्वये त्याला प्राप्त झालेली सर्व फी, शासन विहित करील त्याप्रमाणे व अशा रीतीने आणि अशा कालावधीत अशा प्राधिकरणाकडे हस्तांतरित करील व चुकती करील आणि ती [1][ * * * ] सरकारच्या खात्यात दाखविण्यात येईल व जमा करण्यात येईल.

## भाग पाच

## लेखापरीक्षा

**पदस्थ विश्वस्तांचे लेखे, इत्यादी तपासण्यासाठी आणि शासनास अहवाल देण्यासाठी लेखा-परीक्षकांची नियुक्ती करणे.**

१९. (१) पदस्थ विश्वस्तांच्या लेख्यांची लेखापरीक्षा वर्षातून किमान एकदा आणि शासनाने जर तसे निदेश दिले असतील तर, अन्य कोणत्याही वेळी विहित केलेल्या व्यक्तीकडून आणि विहित केलेल्या रीतीने करण्यात येईल.

(२) लेखापरीक्षक अशा लेख्यांची तपासणी करील आणि त्यासंबंधातील विवरणपत्र विहित नमुन्यामध्ये शासनाला पाठवील आणि त्यासोबत त्यावर अहवाल देईल व पुढील गोष्टी दर्शवून आपली स्वाक्षरी करून प्रमाणपत्र देईल.--

[2][(अ) लेख्यांची लेखापरीक्षा विहित रीतीने करण्यात आली आहे किंवा कसे, आणि अशा लेखापरीक्षेद्वारे पूर्ण लेख्यांचा समावेश आहे किंवा कसे आणि त्यात ज्या गोष्टी अंतर्भूत असल्या पाहिजेत त्या सर्व गोष्टींचा खराखुरा हिशेब देण्यात आला आहे किंवा कसे;]

(ब) या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांद्वारे पदस्थ विश्वस्ताला जी पुस्तके ठेवावयाचे निदेश देण्यात आले आहेत त्यानुसार ती योग्य रीतीने आणि नियमितपणे ठेवण्यात येत आहेत किंवा कसे; आणि

(क) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने, न्यास निधी व रोखे यथोचितरीत्या ठेवण्यात येत असून ते गुंतवण्यात व ठेव म्हणून ठेवण्यात येत आहेत किंवा कसे; किंवा

(यथास्थिति), असे लेखे तुटीचे आहेत किंवा पदस्थ विश्वस्ताने अशा प्रमाणपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे अशा संदर्भात, या अधिनियमाचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे अनुपालन करण्यास कसूर केली आहे.

**साक्षीदारांना समन्स बजावण्याचे आणि दस्तऐवज मागवण्याचे लेखापरीक्षकांचे अधिकार.**

२०. (१) प्रत्येक लेखापरीक्षकाला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील. **१९०८ चा ५.**

(अ) ज्याची उपस्थिती आवश्यक आहे असे त्याला वेळोवेळी वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस उपस्थित राहण्याविषयी समन्स बजावणे; आणि

(ब) त्याने प्रशासित करावयाच्या कोणत्याही व्यक्तीची शपथेवर तपासणी करणे; आणि

(क) कोणत्याही व्यक्तीची प्रश्नोत्तरांवर किंवा अन्यप्रकारे तपासणी करण्याकरिता आयोगपत्र बजावणे; आणि

---

[1] सन १९२२ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ४ द्वारे, "भारत" हा मजकूर निरसित केला.

[2] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १२ द्वारे मूळ खंड (अ) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ड) अशी लेखापरीक्षा किंवा तपासणी यांच्या प्रयोजनांकरिता जे सादर करणे आवश्यक आहे असे कोणतेही दस्तऐवज किंवा कोणतीही गोष्ट सादर करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला समन्स बजावणे.

(२) जेव्हा एखाद्या व्यक्तीला समन्स बजावण्यात आले असेल, तिने उपस्थित राहण्यास नकार **१८६०** दिला असेल अथवा वाजवी कारण न देता दुर्लक्ष केले असेल किंवा कोणताही दस्तऐवज वा **चा ४५.** गोष्ट सादर करण्याकडे दुर्लक्ष केले असेल किंवा उपस्थित राहिली असेल व दस्तऐवज वा गोष्ट दाखवावयासाठी अथवा तपासावयासाठी नकार दिला असेल तर त्या व्यक्तीने भारतीय दंड संहितेच्या अर्थांतर्गत अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्या कलम १८८ अन्वये ती शिक्षेस पात्र होईल आणि लेखापरीक्षक अशा नकाराचे किंवा दुर्लक्षित केल्याचे प्रत्येक प्रकरण शासनाला कळवील.

**लेखापरीक्षेचा खर्च, वगैरे कसा द्यावयाचा.** २१. अशा प्रत्येक लेखापरीक्षेचा आणि तपासणीचा खर्च आणि तदानुषंगिक खर्च, शासनाने केलेल्या नियमांनुसार निर्धारित करण्यात येईल आणि विहित केलेल्या रीतीने भागवण्यात येईल.

**लेख्यांच्या प्रती तपासण्याचा लाभार्थीचा हक्क.** २२. पदस्थ विश्वस्ताकडून प्रशासित करण्यात येत असलेल्या न्यासाचा प्रत्येक लाभार्थी, **१८८२** विहित करण्यात येईल अशा शर्तींना आणि निर्बंधाना अधीन राहून, सर्व वाजवी कालावधीत, अशा **चा २.** न्यासाच्या लेख्यांची तपासणी करण्यासाठी लेखापरीक्षकाच्या अहवालाची व प्रमाणपत्राची प्रत किंवा त्यातील उतारे सादर करावयासाठी हक्कदार असेल आणि विहित फी प्रदान केल्यावर आणि भारतीय न्यास अधिनियम, १८८२ मधील कोणत्याही गोष्टीमुळे या कलमाच्या तरतुदींना बाधा पोचणार नाही.

## भाग सहा

## संकीर्ण

**शासकीय विश्वस्ताच्या अखत्यारीत असणारे संचय शासनाकडे हस्तांतरित करणे.** २३. न्यासाच्या लाभार्थीला देय असणारा सर्व पैसा हा, बारा वर्षांच्या किंवा त्याहून अधिक कालावधीकरिता कोणत्याही विश्वस्ताच्या अखत्यारीत असेल-- मग तो या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी असो किंवा प्रारंभानंतर असो किंवा नसो-- पदस्थ विश्वस्त तो पैसा प्राप्त करण्यास हक्कदार असणाऱ्या व्यक्तीचा मागोवा घेण्यास असमर्थ असेल त्याप्रकरणी, असा पैसा विहित केलेल्या रीतीने [1][* * *] सरकारच्या खात्यात हस्तांतरित करण्यात येईल आणि जमा करण्यात येईल :

परंतु, कोणत्याही न्यायालयात अशा कोणत्याही पैशाच्या संबंधात कोणताही दावा किंवा कार्यवाही प्रलंबित असेल तर, तो अशा प्रकारे हस्तांतरित करण्यात येणार नाही.

---

[1] सन १९२२ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ४ द्वारे "भारत" हा मजकूर निरसित करण्यात आला.

**अशाप्रकारे हस्तांतरित केलेला पैसा वसूल करण्यासाठी मागणी-दाराकडून कार्यवाहीची पद्धत.**

२४. (१) अशा प्रकारे हस्तांतरित करण्यात आलेल्या कोणत्याही पैशाची कोणतीही मागणी करण्यात आली असेल तर आणि अशी मागणी विहित प्राधिकाऱ्याची खात्री पटून प्रस्थापित झाली असेल तर [1][* * *] सरकार, ज्या रकमेच्या संबंधात मागणी प्रस्थापित झाली असेल अशी रक्कम मागणीदारास देईल.

(२) अशी मागणी विहित प्राधिकाऱ्याची खात्री पटून प्रस्थापित झाली नसेल तर, मागणीदारास [2][सरकारच्या] विरोधात उच्च न्यायालयाकडे केलेल्या विनंती अर्जाद्वारे, अशा पैशांच्या वसुलीकरिता त्याच्या हक्कास बाध न आणता, अन्य कोणतीही कार्यवाही हाती घेता येईल आणि त्यास योग्य वाटेल असा, पुरावा घेतल्यानंतर, असे न्यायालय, त्यास योग्य वाटेल असा, अशा पैशांच्या प्रदानाच्या संदर्भातील विनंतीअर्जावर असा आदेश काढील आणि असा आदेश कार्यवाहीसाठी सर्व पक्षकारांवर बांधील असेल.

[3][* * * *]

(३) न्यायालयास, अशा कार्यवाहींचा सर्व खर्च किंवा खर्चाचा कोणताही भाग देण्यात येईल अशा व्यक्तीस आणखी निदेश देता येतील.

**पदस्थ विश्वस्ताकडे निहित असलेल्या मालमत्तेच्या संबंधात आदेश काढण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार.**

२५. उच्च न्यायालयास, पदस्थ विश्वस्ताकडे निहित असलेल्या कोणत्याही न्यासाच्या मालमत्तेच्या किंवा त्याच्या [4][प्राप्तीच्या] अथवा उत्पादनाच्या संबंधात, त्यास योग्य वाटेल असा निदेश काढता येईल.

**अधिनियमा-अन्वये आदेशाकरिता कोणास अर्ज करता येईल.**

२६. कोणत्याही न्यास मालमत्तेमध्ये लाभ मिळवण्याच्या दृष्टीने हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा त्याच्या कोणत्याही विश्वस्ताच्या अर्जावरून, या अधिनियमाअन्वये कोणताही आदेश काढता येईल.

---

[1] सन १९२२ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ४ द्वारे, "भारत" हा मजकूर निरसित करण्यात आला.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे परंतुक निरसित करण्यात आले.

[4] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १३ द्वारे "हितसंबंधाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**हुकूमनामा लागू करण्याचा न्यायालयाचा आदेश.** २७. या अधिनियमान्वये उच्च न्यायालयाने काढलेला कोणताही आदेश हा, हुकूमनामा लागू केला असेल त्याप्रमाणेच लागू होईल.

**प्रशासनाचे सर्वसाधारण अधिकार.** २८. पदस्थ विश्वस्तास, कायदेशीरदृष्ट्या वापरण्यायोग्य असलेल्या खर्चाच्या अन्य कोणत्याही अधिकारांत भर घालून आणि न्यूनीकरण न करता,--

(अ) त्याच्याकडून प्रशासित केल्या जाणाऱ्या कोणत्याही न्यासाच्या कोणत्याही मालमत्तेची योग्य काळजी व व्यवस्थापन करण्याकरिता आवश्यक असतील अशा कृती; आणि

(ब) उच्च न्यायालयाच्या मंजुरीने अशा धार्मिक, धर्मादाय आणि इतर उद्देश आणि अशा मालमत्तेच्या बाबतीत वाजवी आणि योग्य असेल त्याप्रमाणे अशा सुधारणा यावर खर्च करता येईल.

**पदस्थ विश्वस्ताकडून मूळ विश्वस्ताकडे किंवा अन्य कोणत्याही विश्वस्ताकडे न्यास मालमत्तेचे हस्तांतरण.** २९. (१) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे पदस्थ विश्वस्ताकडे निहित असलेली कोणतीही मालमत्ता पुढील व्यक्तींकडे हस्तांतरित करण्यास प्रतिबंध असणार नाही असे मानण्यात येईल.--

(अ) मूळ विश्वस्त (कोणताही असल्यास); किंवा

(ब) कायदेशीररीत्या नियुक्त केलेला अन्य कोणताही विश्वस्त; किंवा

(क) न्यायालयाने तसे निदेश दिले असतील तर अशी अन्य कोणतीही व्यक्ती.

(२) अशा हस्तांतरणानंतर अशी मालमत्ता अशा विश्वस्ताकडे निहित होईल आणि अशा हस्तांतरणापूर्वी ज्या न्यासाने ती धारण केली होती त्याच न्यासावर असलेल्या विश्वस्ताकडून धारण करण्यात येईल आणि पदस्थ विश्वस्त, अशा हस्तांतरणापूर्वी केलेल्या कामांच्या संबंधात, असेल त्या व्यतिरिक्त, अशा मालमत्तेचा विश्वस्त म्हणून त्यास सर्व दायित्वांपासून सूट देईल:

परंतु, या कलमान्वये कोणत्याही हस्तांतरणाच्या बाबतीत, पदस्थ विश्वस्त, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार मालमत्तेपैकी आकारणीयोग्य असलेली कोणतीही फी धारण करण्यास हक्कदार असेल.

**नियम.** ३०. (१) सरकार, या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी आणि पदस्थ विश्वस्ताला त्याची कर्तव्ये पार पाडताना कार्यवाहींचे विनियमन करण्याकरिता नियम करील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांमध्ये, पुढील गोष्टींची तरतूद करता येईल.--

(अ) पदस्थ विश्वस्ताने ठेवावयाचे लेखे आणि त्याची लेखापरीक्षा व तपासणी;

(ब) पदस्थ विश्वस्ताच्या अखत्यारीत असलेल्या निधींचा सुरक्षित ताबा आणि निधी आणि प्रतिभूती यांच्या ठेवी;

(क) ज्या प्रकरणांमध्ये वित्तप्रेषण आवश्यक आहे, त्या प्रकरणांमध्ये पदस्थ विश्वस्ताच्या अखत्यारीत असलेल्या पैशाच्या रकमांचे वित्तप्रेषण;

(ड) पदस्थ विश्वस्ताने सरकारला किंवा अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याला सादर करावयाची विवरणपत्रे, अनुसूच्या आणि इतर दस्तऐवज आणि अशा विवरणपत्रांची, अनुसूच्यांची किंवा इतर दस्तऐवजांची प्रसिद्धी;

(इ) अशी कोणतीही विवरणपत्रे, अनुसूच्या किंवा इतर दस्तऐवज तयार करताना खर्चाची वसुली;

[१][ * * * *]

(फ) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, त्याखाली द्यावयाची फी आणि अशा प्रकारे निश्चित केलेल्या कोणत्याही फीची वसुली आणि त्याचे लेखांकन;

(ग) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये कोणत्याही लेखापरीक्षेचा खर्च आणि तदानुषंगिक खर्च निर्धारित करावयाची व भागवावयाची रीत आणि ज्याच्याकडून ती निर्धारित करावयाची व भागवावयाची ती व्यक्ती;

(ह) कलम २० च्या तरतुदींअन्वये बजावण्यात यावयाच्या समन्सची रीत आणि या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये समन्स बजावलेल्या किंवा तपासणी केलेल्या कोणत्याही व्यक्तींच्या खर्चाचे प्रदान आणि अशा तपासणीशी संबंधित कोणत्याही खर्चाचे प्रदान;

(आय) धार्मिक प्रयोजनांसाठी न्यासांच्या पदस्थ विश्वस्ताकडून आणि कामकाजाच्या व्यवस्थापनात किंवा कामकाज चालविण्यासाठी अंतर्भाव असणाऱ्या न्यासाकडून स्वीकृती; आणि

(जे) विहित करावयाचे निदेश दिलेली या अधिनियमातील कोणतीही बाब.

(३) या कलमाच्या तरतुदींअन्वये करण्यात आलेले नियम हे, राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील आणि त्यानंतर ते या अधिनियमामध्ये अधिनियमित केल्याप्रमाणे लागू होतील.

[२][(४) या कलमान्वये केंद्र सरकारकडून करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत मिळून बनलेल्या तीस दिवसांच्या एकूण कालावधीकरिता, अधिवेशन चालू असताना ते संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्यात येईल आणि ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, तो अशा प्रकारे ठेवण्यात आला तर, या नियमात कोणताही फेरबदल करण्यात येऊ नये. यासाठी दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा असा कोणताही नियम करण्यात येऊ नये यासाठी दोन्ही सभागृहे सहमत होतील; त्यानंतरच तो केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात

---

[१] सन १९१७ चा अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ६ आणि अनुसूची याद्वारे खंड (ई.ई.) निरसित करण्यात आला.

[२] सन १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १४ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

३१. [इलाख्याची प्रांतामध्ये विभागणी]-- भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे निरसित. **१९०८ चा १६.**

**भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या तरतुदींची व्यावृत्ती.** ३२. या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या तरतुदींना बाधा येणार नाही असे मानण्यात येईल.

**व्यावृत्ती.** [१][३२ अ. [२][(१)] [३][दिनांक २६ जानेवारी, १९५० रोजी] अंमलात आलेल्या या अधिनियमाच्या सुधारणा यांमुळे त्या दिनांकास कोणत्याही न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहींना बाधा पोचणार नाही किंवा कोणत्याही पदस्थ विश्वस्ताकडून कोणत्याही अन्य पदस्थ विश्वस्ताकडे कोणतीही मालमत्ता आपोआप हस्तांतरित झाली असा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही; पण या कलमातील कोणतीही गोष्ट, या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींनुसार, अशी कोणतीही मालमत्ता हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करील असा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.]

[४][(२) दिनांक २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आलेल्या या अधिनियमाच्या सुधारणा यांमुळे भाग ' ब ' राज्यामधील कोणत्याही व्यक्तीला हा अधिनियम लागू करताना उद्‌भवलेल्या आणि उक्त दिनांकास कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीला किंवा या अधिनियमान्वये एखाद्या पदस्थ विश्वस्ताकडे त्या दिनांकाच्या लगतपूर्वी निहित होते अशा कोणत्याही मालमत्तेच्या किंवा संपदेच्या व्यवस्थापनाला बाधा पोचणार नाही, आणि या अधिनियमाच्या तरतुदी, उक्त सुधारणांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा कार्यवाहींच्या किंवा अशा मालमत्तेच्या किंवा यथास्थिति, संपदेच्या संबंधात, आवश्यक फेरबदलांना लागू असण्याचे चालू राहील.]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, पोट-कलम (१) असा पुन्हा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[३] वरील आदेशाद्वारे "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ याच्या भाग तीनच्या प्रारंभास" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**राज्य पुनर्रचनेद्वारे बाधा पोचलेल्या विवक्षित पदस्थ विश्वस्तांच्या संबंधात विशेष तरतूद.**

[1][३२ ब. दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ रोजी अंमलात आलेल्या या अधिनियमाच्या सुधारणा यांमुळे, त्या दिनांकास आणि राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ किंवा बिहार आणि पश्चिम बंगाल (राज्यक्षेत्रांचे हस्तांतरण) अधिनियम, १९५६ यांअन्वये राज्यांच्या पुनर्रचनेमुळे राज्याचा संपूर्ण किंवा कोणताही भाग अन्य कोणत्याही राज्याकडे हस्तांतरित करण्यात आला आहे अशा कोणत्याही न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहींना बाधा पोचणार नाही, राज्यक्षेत्राच्या अशा हस्तांतरणाचा कोणत्याही पदस्थ विश्वस्ताकडून अन्य कोणत्याही पदस्थ विश्वस्ताकडे कोणतीही मालमत्ता आपोआप हस्तांतरण झाली आहे असा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही; पण, राज्य क्षेत्राच्या अशा हस्तांतरणामुळे, एखाद्या पदस्थ विश्वस्ताकडे निहित असलेल्या मालमत्तेचा संपूर्ण किंवा कोणताही भाग अन्य पदस्थ विश्वस्तांकडे निहित करावा असे केंद्र सरकारला वाटले तर, सरकार, मालमत्ता अशाप्रकारे निहित करण्यात यावी, असा निदेश देईल आणि त्यानंतर, ती त्या इतर पदस्थ विश्वस्ताकडे आणि त्याच्या वारसदारांकडे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, या अधिनियमाअन्वये जणू काही ती मुळात त्याच्याचकडे निहित होती असे समजून पूर्णपणे आणि प्रभावीपणे निहित होईल.]

३३. [निरसित] निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १२) याच्या कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

अनुसूची.-- [निरसित अधिनियमित] वरील अधिनियमाच्या कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

---

[1] विधि अनुकूलन आदेश, (क्रमांक २), १९५६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

---

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६